# साहसी चिनू

अविनाश अकोलकर



साहसी चिनू

◆


© सुरक्षित


◆

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆

**किंमत :**
रुपये १४०/-

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | झाडाच्या ढोलीचे रहस्य | ३ |
| २. | घातपाती कृत्य | २३ |
| ३. | परोपकारी चिनू | ४१ |
| ४. | शॉपिंग मॉलचा चोर | ६० |
| ५. | पडक्या विहिरीतील भूत | ८० |
| ६. | चिनूची जनजागृती | १०० |
| ७. | चिनूचे अपहरण | ११८ |
| ८. | साखळी चोरांशी सामना | १३७ |
| ९. | चिनूचे भटके उद्योग | १५६ |
| १०. | चिनूचे प्रौढशिक्षण वर्ग | १७४ |


✦✦



# झाडाच्या ढोलीचे रहस्य

''चिन्मय, ए चिनू.'' कुठे गेला हा पोरगा ? काही कळत नाही. मी हाक मारली आणि याने ओ दिली तर शपथ. बघावं तेव्हा बाहेर मित्रांसोबत उंडरत असतो. अभ्यासाला बस म्हटलं की आत्ता येतो असं सांगून जो गायब होतो ते एकदम बाप यायच्या आत परत येतो. परीक्षा दोन महिन्यांवर आली आहे; पण अजूनपर्यंत याने पुस्तकाचे पान उघडले नाही. हे काय मी एकटीच इथे बडबडत बसले आहे. हा अजून आला नाही. 'सूनबाई, चिन्मय कुठे गेला आहे ? तुला काही सांगून गेला आहे का ?'' श्रीमती गोदावरी पेंडसे उर्फ चिनूच्या आजी चिनूच्या नावाने ओरडत घरभर फिरत होत्या.

चिन्मय उर्फ चिनू म्हणजे चिन्मय पेंडसे. वय वर्ष बारा. सध्या सातवीला होता. अत्यंत हुशार आणि वयाच्या मानाने धाडसी होता. आजी त्याच्या नावाने ओरडत घरभर फिरत होती; पण तो घरी नव्हताच तर तिच्या हाकेला ओ कसा काय देणार ? तो आपल्या मित्रांसोबत पुरंदरचा किल्ला पाहायला गेला होता. जाताना त्याने फक्त आईलाच सांगितलं होतं. शिवाय हेही बजावलं होतं की आजीला मी कुठे गेलो आहे हे सांगू नकोस, कारण त्याला माहीत होतं आपण आजीला पुरंदरचा किल्ला पाहायला जाऊ का असं विचारायला गेलो तर ती परवानगी देणार नाहीच; पण लेक्चर मात्र भरपूर देईल. तू अजून लहान आहेस. तुझी परीक्षा जवळ आली आहे. उगाच पडलास आणि हात–पाय मुरगळला तर तू परीक्षा कशी देणार. त्यापेक्षा तुझी परीक्षा झाली की आपण सगळेच किल्ला पाहायला जाऊया. तू आता अभ्यास करत बस पाहू. हे असं सगळं ऐकावं लागलं असतं. त्यापेक्षा तिला न सांगितलेलं बरं. आल्यावर सांगून मग तिचा ओरडा खाऊया असा विचार करून आईला चार चार वेळा बजावून मगच तो किल्ला पाहायला गेला होता. तसा तो एकटाच नव्हता गेला. त्याच्याबरोबर त्याचे मित्र होते. केदार,

राघव, प्रशांत आणि प्राची ही त्यांची नावे होती. हे चौघेही त्याच्या शाळेतील आणि एका वर्गातील होते. चिनूला लहानपणापासूनच धाडसाची आवड होती. तसा आतासुद्धा तो एवढा मोठा नव्हता; पण त्याला धाडसाची आवड होती एवढं मात्र खरं होतं. डर हा शब्द आपल्या डिक्शनरीतच नाही हे त्याचं नेहमीचं वाक्य होतं. त्यामुळे या वयातदेखील तो शूर आणि धाडसी होता.

चिनू पाच वर्षांचा असताना एकदा आपल्या मावशीबरोबर तलाव बघायला गेला होता. त्या तलावावर बऱ्याच बायका कपडे धुवायच्या. चिनूची मावशी पण कपड्याचे गाठोडे घेऊन तलावावर निघाली.

हा तिच्या मागे लागला, ''मला पण तलाव बघायला यायचंय.'' याने हट्टच धरला.

''आपण नंतर जाऊया. मी कपडे धुवून पटकन येते. मग आपण परत जाऊया.'' मावशीने त्याला पटवायचा प्रयत्न केला; पण तो काहीच ऐकायला तयार नव्हता. शेवटी मावशी त्याच्यापुढे हरली. ''चल बाबा, पण इकडे तिकडे हिंडायचं नाही. एका जागेवर गप्प बसून राहायचं.'' असा दम देऊन ती त्याला तलावावर घेऊन गेली.

चिनूची मावशी पनवेलला राहात होती. चिनू मे महिन्याच्या सुट्टीत तिच्याकडे गेला होता. पनवेलला त्यावेळेस पाण्याचा तुटवडा होता. घरातील नळाला जेमतेम अर्धा तास पाणी यायचं. ते फक्त पिण्यापुरतं आणि भांडी घासण्यापुरतं भरून व्हायचं. मावशीच्या घरापासून तलाव थोडा लांब होता. मावशी तरीसुद्धा इतक्या लांब कपडे धुवायला जायची. आता काय आमचा चिनू महाशय पण तिच्याबरोबर तिचं बोट धरून निघाला होता.

दोघेजण तलावावर पोहोचले. तलाव बराच मोठा होता. तेथे गर्दी थोडी कमी होती. मावशीने डोक्यावरचे गाठोडे खाली ठेवले. चिनूला काठावरच्या मोठ्या दगडावर बसवले. येताना मावशीने चणे, चॉकलेट आणि गोळ्या असा खाऊचा स्टॉक घेतला होता. हेतू हा की, आपले कपडे धुवून होईपर्यंत याने कुठे जाऊ नये. खाऊ खात बसून राहावे. तिने सगळे त्याला दिले.

''धर हा खाऊ. खात बस. मी पटापट कपडे धुवून येते. इथून हलू नकोस.'' असं म्हणून मावशीने गाठोड्यातील कपडे काढले आणि ती धुवायला बसली.

आमचा हा हिरो एका खाऊचा फडशा पाडला की दुसरा खात होता. त्याचे तिन्ही खाऊ संपले. तो उठून उभा राहिला. एका जागी बसून बसून त्याला कंटाळा आला होता आणि विशेष म्हणजे खाऊही संपला होता. आता काय करायचं ? त्याला मोठा प्रश्न पडला होता. त्याने एकदा मावशीकडे बघितले. ती तल्लीन आणि निर्धास्त होऊन कपडे धूत होती. आपला पराक्रमी भाचा काय उद्योग करतोय याकडे तिचे लक्षच नव्हते. हे चिरंजीव निघाले भटकंती करायला. तलावाच्या काठावरून फिरत पाण्यात दगडं मारत तो आरामात फिरत होता. फिरत फिरत मावशीपासून बऱ्याच अंतरावर आला होता. फिरता फिरता त्याचे लक्ष छोट्या माशांकडे गेले. सोनेरी आणि निळ्या

रंगाचे ते मासे इकडून तिकडून फिरत होते. मध्येच पाण्यात गडप होत होते. परत बाहेर येत होते. ते बघून त्याला मजा वाटत होती. अचानक तो पुढे सरकला. आपण पाण्यात उतरलो आहोत हे त्याच्या लक्षातच आले नाही. तो मासे आणि त्यांच्या हालचाली बघण्यात तल्लीन झाला होता. मासे पुढे पळाले की हा पण पुढे पळत होता. आता पाणी त्याच्या गुडघ्यापर्यंत आले होते. त्याची चड्डी ओली झालेली पण त्याला कळली नाही. तो अजून पुढे सरकला. पाणी त्याच्या छातीपर्यंत आले. पुढे त्याच्या पायाला एक मोठा खडक लागला आणि तो धप्पकन पडला. त्याच्या नाकातोंडात पाणी गेले. आता मात्र त्याला कळले की आपण मासे बघत बघत तलावात उतरलो आहोत. तो पाण्यात पडूनही घाबरला नव्हता; पण त्याला पाण्यात पडताना बघून काठावरचे लोक ओरडायला लागले. ''मुलगा पडला. मुलगा पाण्यात बुडाला.'' काठावर गर्दी जमली.

''चिनू झाले हं कपडे धुवून. आता आपण निघूया.'' असं बडबडत मावशी मागे वळली. बघते तर चिनू जागेवर नाही. ती घाबरली. ''अरेच्या ! हा चिनू कुठे गेला. चिनू, ए चिनू'' ती हाका मारायला लागली; पण तो कुठेच दिसला नाही. इतक्यात तिच्या कानावर लोकांचा गलका आला. सगळेजण तलावाच्या विरुद्ध दिशेने धावत होते. मावशीने एका बाईला थांबवून विचारले, ''काय झालं बाई, सगळेजण का धावत आहेत ?''

''अहो, एक लहान मुलगा पाण्यात पडलाय. सगळेजण तिकडेच पळताहेत.'' असं म्हणून ती बाई परत पळायला लागली.



लहान मुलगा पाण्यात पडलाय हे ऐकलं आणि मावशीच्या काळजात धस्स झालं. तो चिनू तर नसेल ? तिच्या मनात आलं. तिनं कपडे तसेच टाकले आणि ती जिवाच्या आकांताने त्या दिशेला पळायला लागली.

चिनू आरामात आतील खडकावर बसून होता. ही मोठी माणसं एवढी का ओरडत आहेत, त्याला कळत नव्हतं. मावशी धावत पळत धापा टाकत तिथे पोहोचली. बघते तर तो चिनूच होता. तिची शंका खरी ठरली होती; पण तो बुडाला नव्हता. आरामात खडकावर बसून होता.

''चिनू बाहेर ये, आत पाण्यात काय करतोस ?'' मावशी जोरात ओरडली.

चिनूने धप्पकन पाण्यात उडी मारली आणि आरामात बाहेर आला.

''गधड्या, तुला मी एका जागी गप्प बसायला सांगितलं होतं ना! मग इकडे कसा काय आलास ?'' मावशीने रागाने विचारले.

''मी किती वेळ गप्प बसू ? तू दिलेला खाऊसुद्धा खाऊन संपला होता. मला एका जागी बसून कंटाळा आला म्हणून फिरायला गेलो. मला इथे छान छान मासे दिसले. मी त्यांच्या मागे पळत या पाण्यात आलो; पण बुडालो नाही, कारण इथे मोठा दगड होता. त्या दगडावर बसून राहिलो. ही मोठी माणसं उगाच घाबरून ओरडत होती. मी घाबरलोच नाही. घाबरणारही नाही. मला घाबरायला आवडत नाही.'' चिनू ठामपणे बोलला.

तर असा हा चिनू. लहानपणापासूनच धाडसी. आता तो आपल्या मित्रांबरोबर पुरंदर किल्ला पाहायला निघाला होता.

''चिनू, आपल्याला अजून किती वर चढायचं आहे ? मी तर थकले बाबा.'' प्राचीने कपाळावर आलेला घाम पुसत दगडावर बसत विचारले.

''प्राची, मी तुला अगोदरच सांगितलं होतं की, आपल्याला खूप वरपर्यंत चढत जायचं आहे. तुला जमणार नाही. तू येऊ नकोस; पण तू हट्टाने आलीस. माझं ऐकलं नाहीस. आता आली आहेस ना मग थांबतेस कशाला, चल लवकर. हे बघ थोडंसंच राहिलं आहे. तो बघ तुला तो सुळका दिसतोय ना, तिथंपर्यंत जायचं आहे आपल्याला.'' चिनूने तिला लांब दिसणारा सुळका दाखवत म्हटले.

तो सुळका बघून प्राची घाबरली. ''बापरे तो सुळका ! अरे, तो किती लांब आहे आपल्यापासून.'' केदार तिथे धापा टाकत येत म्हणाला.

''झालं ! हा केदारसुद्धा धापा टाकायला लागला बघ चिनू. कशाला आणलंस रे या दोघांना आपल्याबरोबर ?'' राघवने चिडून चिनूला विचारले.

''ए राघू, उगाच रूबाब दाखवू नकोस. माहीत आहे तू किती पहेलवान आहेस. थोड्या वेळाने तूसुद्धा धापा टाकायला लागशील बघ.'' प्राची त्याला चिडवत म्हणाली.

''धापा टाकायला मी काय तुझ्यासारखी मुलगी नाही. मी मर्द का बच्चा आहे समजलीस काय ?'' राघव तिला असं तावातावाने बोलायला आणि समोरच्या झाडीत खसखस असा आवाज करीत एक रानमांजर पळायला एकच गाठ पडली; पण त्या आवाजामुळे आणि मांजरामुळे राघव घाबरून मोठ्याने किंचाळला.

''काय पहेलवान काय झालं ?'' प्राचीने हसत विचारले.

''अगं, तो मर्द का बच्चा आहे. कधी घाबरत नाही की थकत नाही. हो की नाही राघव ?'' केदारने हसत त्याला चिडवत म्हटले.

''ए चला लवकर. आपल्याला उशीर होतोय. तो चिनू बघ किती भरभर वर गेला. आपण अजून मागेच आहोत.'' प्रशांत त्या तिघांना म्हणाला. सगळेजण भरभर वर चढायला लागले.

चिनू त्यांच्या अगोदर येऊन हातपाय तोंड धुवून फ्रेश होऊन त्यांची वाट पाहात थांबला होता. सगळेजण हळूहळू धापा टाकत त्याच्याजवळ येऊन बसले.

''काय बालवीरांनो थकलात काय ? अरे, एवढासा किल्ला चढलात तर थकलात. मग तुम्ही एव्हरेस्ट कसा काय चढणार ?'' चिनूने हसत सगळ्यांना विचारले.

''बाप रे ! हा किल्ला झाल्यानंतर आपण एव्हरेस्टवर चढायचं ? मी नाही बाई यायची तुमच्याबरोबर, मी इथेच थांबते. तुम्ही जाऊन या एव्हरेस्टवर.'' प्राची अजूनही धापा टाकत होती. ती घाम पुसत चौघांना म्हणाली.

''ए ढ वेडाबाई, अगं एव्हरेस्ट तिकडे हिमालयात आहे. सासवडला नाही. मी फक्त त्याचं उदाहरण दिलं. आपल्याला खरोखर तिकडे जायचं नाही कळलं का ?'' चिनू हसत तिला म्हणाला. सगळेजण हसायला लागले. प्राची ओशाळली.

''ठीक आहे, ठीक आहे. एवढं चिडवायची आणि हसायची गरज नाही. होते कधी कधी माणसाच्या हातून चूक.'' ती रागावली.

''चला, आता नाश्ता करूया. मला भूक लागली आहे. खाऊन मग किल्ला पाहायला सुरुवात करूया.'' राघव म्हणाला. प्रत्येकाने घरून डबा आणला होता. सगळेजण नाष्टा करायला बसले. सगळ्यांचं खाणं सुरू झालं. चिनू खात खात आजूबाजूला पाहात होता. त्याचं लक्ष अचानक एका झाडाकडे गेलं. ते झाड इतर झाडांपेक्षा थोडं मोठं होतं. त्याला आश्चर्य वाटलं. हे झाड कसलं असावं ? तो सॅन्डविच खात खात त्या झाडापाशी आला. त्याने त्या झाडाभोवती एक चक्कर मारली; पण त्याला काहीच दिसलं नाही. तो तेथेच उभा राहून त्या झाडाचं निरीक्षण करायला लागला. त्याला तसं करताना पाहून ते चौघे उठून त्याच्यापाशी आले.

''काय रे चिनू काय झालं ? या झाडाकडे एवढं निरखून काय पाहतोस ?'' प्रशांतने आपल्या हातातील केळ सोलत विचारले.

''काही नाही सहज बघतोय, पण तुम्हाला या झाडात काही विशेष फरक दिसतोय का ?'' चिनूने त्या चौघांना विचारले.

सगळ्यांनी झाडाभोवती एक चक्कर मारली आणि निरखून बघितले, पण त्यांना काहीच फरक जाणवला नाही.

''नाही. आम्हाला तर काहीच दिसलं नाही.'' सगळ्यांनी उत्तर दिलं.

''काहीतरी गडबड आहे.'' चिनू बडबडला.

''चला आपण किल्ला पाहायला निघूया. या चिनूला प्रत्येक गोष्टीत काहीतरी गडबड दिसते. ओ डिटेक्टिव्ह चला आता. नाहीतर आपल्याला उशीर होईल आणि घरी आईचा ओरडा खावा लागेल.'' प्राची चिनूचा हात ओढत म्हणाली.

सगळेजण किल्ला पाहायला निघाले. चिनू अजूनही मागे वळून वळून त्या झाडाकडे पाहात होता. चिनूला आलेला संशय खरा होता का ? त्या झाडात काय होते ? चिनूला ते विशेष का वाटले ?

किल्ल्यावर बराच रानमेवा होता. सगळेजण खूश होते. जांभळं, करवंदं, पेरू, बोरं आणि आवळ्याची बरीच झाडं होती. सगळ्यांनी ताव मारला. खात खात गप्पा मारत सगळेजण किल्ल्यात हुंदडत होते. चिनू मात्र आजूबाजूला पाहात फिरत होता. एका ठिकाणी त्याला सिगारेटची रिकामी पाकिटे दिसली. थोड्या अंतरावर प्लॅस्टिकच्या काही रिकाम्या पिशव्या दिसल्या. त्यात थोडं फरसाण शिल्लक होतं. परत थोडं पुढे गेल्यावर दारूच्या रिकाम्या बाटल्या दिसल्या.

'याचा अर्थ आपल्या व्यतिरिक्त अजूनही कोणीतरी किल्ल्यावर आलेलं आहे; पण कोण ? त्यांचा इथे येण्याचा हेतू काय असावा ? बहुतेक तेसुद्धा आपल्यासारखेच किल्ला बघायला आले असतील. जसा आपण नाश्ता आणला होता त्यांनीसुद्धा आणला असावा. फक्त त्यांच्या नाश्त्यात फरक आहे. त्यांनी फक्त फरसाणच आणला असावा. शिवाय तरुण मंडळी आहेत. आपल्यापेक्षा मोठी आहेत म्हणजे दारू पिणारच. जाऊ दे. आपल्याला काय करायचं आहे.' असं पुटपुटत चिनू पुढे चालायला लागला.

सगळेजण किल्ला पाहात हिंडत एंजॉय करत होते. किल्ल्यात गोड पाण्याची विहीर होती. सगळ्यांनी ती पाहायला जायचं ठरवलं.

''तुम्ही एक काम करा, इथेच थांबा. मी सगळ्यांसाठी पाणी आणतो.'' चिनू सगळ्यांना म्हणाला.

''अरे, पण आम्हालासुद्धा ती विहीर बघायची आहे. आम्ही पण येतो ना.'' प्राचीने हट्ट केला.

''तुमच्यापैकी कोणाला पोहता येतं ?'' चिनूने सगळ्यांना विचारलं.

''विहीर बघण्यासाठी पोहता येणं गरजेचं आहे ?'' प्रशांतने त्याला विचारले.

''होय. तसं गरजेचंही नाही, पण यदाकदाचित पाय घसरून आत पडला तर बाहेर येण्यासाठी ते गरजेचं आहे. बोला कोणाला पोहता येतं ?''

''मला नाही येत. मलाही येत नाही.'' सगळ्यांनी उत्तर दिले.

चिनू हसला. ''नाही येत ना ? मग सगळेजण इथेच बसा. मी झटकन येतो.'' असं म्हणून चिनूने रिकाम्या बाटल्या घेतल्या आणि तो पाणी आणायला विहिरीच्या दिशेने निघाला.

''बघितलं, स्वत:ला पोहता येतं म्हणून किती भाव खातोय !'' चिनूच्या दिशेने बडबडत केदारने हात उडवला.

चिन्मय विहिरीच्या दिशेने निघाला. विहीर थोड्या अंतरावर उरली होती. शिवाय उतारावर होती. तो जसजसा विहिरीच्या जवळ जाऊ लागला तसं त्याच्या कानावर कोणाच्यातरी बोलण्याचा आवाज येऊ लागला. किल्ल्यावर जोरदार वारा असल्यामुळे कोणीतरी बोलत आहे नव्हे कोणीतरी भांडत आहे असं त्याला वाटलं. त्याने आता हळूहळू चालायला सुरुवात केली. ते कोण आहेत आणि कोणत्या विषयावर भांडत आहेत हे ऐकण्याची आणि बघण्याची उत्सुकता त्याला लागली. तसं बघायला गेलं तर आपण कोणाच्या भानगडीत किंवा भांडणात नाक खुपसू



नये. ते बरोबर नाही हे त्याला ठाऊक होतं; पण अशा ठिकाणी ती माणसं कोण आहेत आणि का भांडत आहेत हे आता आपल्याला कळलंच पाहिजे, असा विचार करून तो त्या दिशेने हळूहळू जाऊ लागला.

''जग्या, मला कमीत कमी दोन लाख तरी द्यायला हवेस तू. कारण पार्सल आणायला मीसुद्धा तुला मदत केली आहे. तेव्हा नाही म्हणू नकोस.'' एकजण जग्या नावाच्या आपल्या मित्राला म्हणत होता. त्याचे नाव जगन असावे.

''नाऱ्या, तू मला पार्सल आणायला मदत केलीस हे मान्य आहे; पण प्लॅन माझा होता. म्हणजे माझा हिस्सा जास्त होतो की नाही तूच सांग आणि आपली डिमांड किती लाखाची होती माहीत आहे ना ! पाच लाखाची ! त्यातले एक लाख मी तुला देतोय ना. मग कशाला काळजी करतोस. शिवाय एक लाखसुद्धा कमी नाहीत.'' जगनने नाऱ्या उर्फ नारायणला समजावले.

''अरे, पाचातील मला फक्त एक लाख आणि तुला एकट्याला चार लाख म्हणजे जास्तच होतात असं तुला वाटत नाही?'' नारायणने जगनला नाराजीने म्हटले.

हे जग्या आणि नाऱ्या कोण आहेत ? ते कसल्या पार्सलविषयी बोलत आहेत ? ही पाच लाखाची भानगड काय आहे ? मला वाटतं, मला अजून थोडं पुढं सरकून यांच्या गप्पा ऐकल्या पाहिजेत. म्हणजे कसलं पार्सल आणि कसले पाच लाख हे आपल्याला कळेल, असा विचार करून चिनू परत थोडा पुढे सरकला. आता ते दोघे दिसत होते. दोघेही अठ्ठावीस–तीस वयाचे होते. त्यातील जग्या उंच होता आणि तब्येतीने दणदणीत होता. तर नाऱ्या चेहऱ्यावरून बावळट आणि भित्रा वाटत होता. दोघांच्या अंगात निळ्या रंगाच्या जीन पँट होत्या. जग्याने पिवळा टी शर्ट घातला होता. नाऱ्याच्या अंगात लाल रंगाचा फुल शर्ट होता. दोघांच्या बोलण्यावरून ते दारू प्यायले आहेत हे कळत होते. त्यांच्या हातात सिगारेट्स होत्या. दोघेही धूर काढत होते.

''नाऱ्या, पार्सलचे हातपाय आणि तोंड नीट बांधले आहेस ना ? नाहीतर ऐन टायमाला घोळ होईल.'' जग्याने सिगारेटचा झुरका घेऊन धूर आकाशात सोडत विचारले.

''फिकर करू नकोस. मी पक्का बंदोबस्त केला आहे. त्याच्या तोंडात माझ्या खिशातील रुमाल कोंबला आहे. कितीही बोंबलला तरी त्याचा आवाज बाहेर येणार नाही.'' नाऱ्या बोलला.

''तू पार्सलच्या घरी फोन केला आहेस ना ? कारण पार्सलला आणून आता दोन तास झालेत. मला वाटतं आपण अजून एक फोन करूया आणि त्यांना पैशांची आठवण करूया.''

''पण त्यांना पैसे घेऊन कुठे बोलवायचं ?''

''इथेच बोलावूया. इथे काहीच धोका नाही. शिवाय कोणाला संशयही येणार नाही.'' जग्याने पुन्हा धूर सोडत म्हटले.

''हे सगळं ठीक आहे; पण माझ्या हिश्श्याचं काय ?'' नाऱ्या आपल्या हिश्श्याचं विसरायला तयार नव्हता.